नवे पुस्तक

गणेश राऊत




**राम ताकवले**
– कविता भालेराव
राजहंस प्रकाशन, पुणे
पृष्ठे १९५, मूल्ये २५० रुपये

# शिक्षणक्षेत्रातील 'ताकवले प्रयोग'

दहा प्रकरणे आणि दोन परिशिष्टे यांच्या माध्यमातून कविता भालेराव यांनी 'राम ताकवले' यांची कहाणी खुलवत नेली आहे. वयाच्या नव्वदीतही कार्यरत असणाऱ्या ताकवले सरांनी तीन विद्यापीठांचे कुलगुरूपद भूषविले आहे. भारतीय शिक्षणपद्धतीचा मुळापासून अभ्यास त्यांनी केला आहे आणि देशपरदेशांत प्रशिक्षण घेतल्याने मूळच्या गांधीवादी 'नई तालीम'चा विचार त्यांच्या मनात अधिकच घट्ट झाला. खरं म्हणजे हा समाजविकासकेंद्री शिक्षणविचारांचा शोध आहे. यामुळेच लेखिकेने त्यांना 'शिक्षणप्रयोगांचे कर्मवीर' असे म्हटले आहे. 'जो जे वांछील ते शिक्षण त्याला लाभो' या ठाम विचारसरणीवर आधारित शिक्षणतज्ज्ञाचे हे चरित्र आहे.

पहिलेच प्रकरण 'हरगुड्याचे ताकवले घराणे' हे आहे. हे प्रकरण स्थानिक इतिहास, स्वातंत्र्यपूर्व कालखंडातील वातावरण व १९४२ ची चळवळ समजण्यास उपयुक्त आहे. यात ताकवले यांनी शैक्षणिक क्षेत्रातील अपयशाचे यशात रूपांतर कसे केले ते वाचून आश्चर्य वाटते.

'विद्येच्या माहेरघरी' या दुसऱ्या प्रकरणात राम ताकवले यांचे पुणे शहरात आगमन व येथील प्रतिकूल परिस्थितीचे अनुकूल परिस्थितीत रूपांतर करण्याचा काळ येतो. ताकवले यांनी शेवटच्या वर्षात प्रथम वर्ग मिळवला. शिक्षणाच्या आड गरिबी येऊ न देता प्रगती केली. फर्ग्युसनच्या नोकरीत त्यांच्या अनुभवकक्षा विस्तारल्या.

शिक्षणक्षेत्रात काही राम राहिला नाही असे म्हणणाऱ्यांनी 'राम ताकवले' हे पुस्तक वाचणे गरजेचे आहे. या पुस्तकाचे उपशीर्षक 'परिवर्तनशील कुलगुरू' असे आहे. उपशीर्षकातच पुस्तकाचा विषय स्पष्ट केला आहे. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण (National Education Policy - NEP) अमलात येत असताना कविता भालेराव यांनी हे चरित्र आपणांसमोर आणले आहे. हा एक अर्थपूर्ण योगायोग आहे. शिक्षणाने काम करण्याची ताकद आली पाहिजे आणि कामातून शिकता आलं पाहिजे हा ध्यास घेणाऱ्यांपैकी एक शिक्षणतज्ज्ञ म्हणजे राम ताकवले. पारंपरिक विद्यापीठ कुलगुरू ते मुक्त विद्यापीठ संस्थापक कुलगुरू असा प्रवास करणाऱ्या ताकवले यांची चरितकहाणी आपण वाचायलाच हवी.



Scanned with OKEN Scanner

राहत होती. काही दिवसांतच जेनी परत गरोदर राहिली. जॉनला जेनीच्या व्यसनाची कल्पना असल्यामुळे जेनी गरोदर आहे हे कळल्यावर तो तिच्यापासून वेगळा झाला. आता तिची केस लेखिकेकडे होती तिच्यापुढे मोठं संकट उभं राहिलं. जेनीकडं बाळ सोपवलं आणि तिच्या व्यसनामुळे तिचं बाळाकडे दुर्लक्ष झालं तर आणि बाळाला काही अपाय झाला तर बालसुरक्षा कायद्याखाली लेखिका काम करत असलेल्या संस्थेला मोठी किंमत मोजावी लागली असती आणि तो धोका पत्करायला संस्थेतील कोणीच तयार नव्हतं. तर अशा प्रसंगात मुले तात्पुरती सांभाळणारी फॉस्टर घरे असतात. यथावकाश जेनीला मुलगी झाली आणि तिचं नाव कॅथरीन ठेवण्यात आलं. नाळ कापल्याबरोबर कॅथरीनला जेनीपासून वेगळं करून फॉस्टर होममध्ये ठेवण्यात आलं. जेनीने खूप आक्रस्ताळेपणा केला पण मुलीला तिच्या ताब्यात दिले नाही. पण ठरावीक वेळापत्रकाप्रमाणे तिला फॉस्टर होममध्ये जाऊन भेटण्याची परवानगी देण्यात आली. काही दिवस ती ठरल्याप्रमाणे मुलीला भेटायला आली. पण नंतर ती येईनाशी झाली आणि ती कोठे गेली हेही समजू शकले नाही. पण तेवढ्यात एक अनुकूल गोष्ट घडली. जॉनने म्हणजे कॅथरीनच्या वडिलांनी तिला सांभाळण्याची जबाबदारी घेण्याची तयारी दाखवली. जॉन आणि कॅथरीन ऑफिसमध्ये भेटू लागले. जॉनला लहान मुले सांभाळण्याचे शिक्षण दिले गेले. जॉनची चांगली कामगिरी पाहिल्यावर त्याला कॅथरीनला घरी घेऊन जाण्याची परवानगी देण्यात आली. पण कोणत्याही परिस्थितीत जेनीला घरात प्रवेश द्यायचा नाही, अशी अट घालण्यात आली आणि ती अट जॉनने मान्य केली. पण एका रविवारी लेखिकेने आणि तिच्या सहकाऱ्याने जॉनच्या घरी अनपेक्षित भेट दिली. त्या वेळी जेनी तिथे असलेली त्यांना दिसली. जॉनने महत्त्वाच्या अटीचा भंग केला असल्यामुळे नियमाप्रमाणे कॅथरीनला संस्थेने ताब्यात घेतले आणि तिची फॉस्टर होममध्ये रवानगी झाली. हे प्रकरण इथेच संपायला हवे पण तसे होत नाही. जॉन आणि जेनी परत एकत्र राहायला लागतात आणि त्यांना एक मुलगा होतो. त्याची जबाबदारी घ्यायला दोघेही तयार होत नाहीत पण जेनीची आई ही जबाबदारी घेते. आणि संस्थेमार्फत या प्रकरणावर पडदा टाकला जातो.

मुले होऊ न देण्याचे सर्व मार्ग उपलब्ध असताना त्यांचा उपयोग न करणं आणि मुलं झाल्यावर त्यांची जबाबदारी घेण्यास नकार देणं, ह्या गोष्टी आपल्याला निश्चित विचित्र वाटतात. आणखी एक गोष्ट उच्चभ्रू समाजातील जूडी आणि ॲलन यांच्या क्रिस्टिना या मुलीची आणि तिच्या नेथन या मुलाची आहे. क्रिस्टिनाचा एक मित्र असतो आणि ते दोघे एकत्र राहत असतात. या संबंधातून क्रिस्टिनाला मुलगा होतो त्याचं नाव नेथन. मुलाची जबाबदारी नको असल्यामुळे क्रिस्टिनाचा मित्र तिला सोडून जातो. पण क्रिस्टिनाला नोकरी असल्यामुळे आणि श्रीमंत आईवडिलांची साथ असल्यामुळे क्रिस्टिना आणि नेथन वेगळ्या घरात आनंदाने राहात असतात पण आता एक वेगळाच गंभीर प्रश्न उद्भवतो. क्रिस्टिनाची बॉस कारेन ही क्रिस्टिनाशी घसट वाढवायला लागते. क्रिस्टिना नोकरी टिकवण्यासाठी हे सहन करते, पण पुढे त्याचे परिवर्तन समलिंगी संबंधांत होते आणि कारेन नेथन आणि क्रिस्टिनाबरोबर राहायलाच येते. आपल्याला न विचारता असे करणे नेथनला आवडत नाही आणि त्यातच कारेन त्याच्याशी लैंगिक गैरवर्तन करू लागते. हे तो आईला सांगतो पण आई त्याकडे दुर्लक्ष करते. त्याचा परिणाम नेथनच्या मनावर होतो आणि तो अंतर्मुख होऊ कुढायला लागतो. पण शेवटी एकदा धीर करून आजीला कारेनच्या वागण्याची कल्पना देतो. आजी या घटनेने हादरते आणि कॅनडातील नियमाप्रमाणे नेथनचा ताबा मिळण्यासाठी लेखिकेच्या संस्थेतर्फे कोर्टात जाते. कोर्ट नेथनचा ताबा आजीला देते. नेथनची एकट्या आईबरोबर राहण्याची तयारी असते. पण क्रिस्टिना त्याला तयार होत नाही आणि शेवटी नेथन आजी-आजोबांबरोबर राहू लागतो. हा एक अगदीच वेगळा प्रश्न असतो आणि आईने समलिंगी मैत्रिणीसाठी मुलाचा त्याग करण्यास तयार होणे हे आपल्या भारतीय मनाला पटत नाही.

हे पुस्तक जरी खऱ्या घटनांवर आधारित असले तरी या घटनांचे वर्णन ओघवते व आपल्याला खिळवून ठेवणारं आहे. या पुस्तकाने मराठी वाङ्मयात एका वेगळ्या विषयावरच्या साहित्याची भर घातली आहे हे नक्की.

**सुधीर आपटे,** सातारा
aptesudhir@gmail.com

**कथा मेपल कळ्यांच्या**
लेखिका : रेवती भागवत
ग्रंथाली प्रकाशन, मुंबई, किंमत २०० रुपये



Scanned with OKEN Scanner

पुढे पुणे विद्यापीठात (आत्ताचे सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ) संधी मिळाली. अशातच लग्न झाले, त्याला मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण हजर होते हे विशेष. पुढे १९६१ ते ६५ या काळात रशियात उच्च शिक्षण, स्वदेशी आगमन, परदेशातील उच्च शिक्षण आणि भारतीय उच्च शिक्षण यातील फरक हा सगळा भाग सरस उतरला आहे. विद्यापीठ, शिक्षकांची मानसिकता, नव्या बदलांविषयीची अनुत्सुकता, इंग्लंडला प्रयाण हा भाग तर मुळापासून वाचण्यासारखा आहे. डॉक्टर आंबेडकरांनी सांगितले आहे, 'समाजसुधारकांना मित्र थोडे आणि शत्रू अधिक असतात.' याची आठवण इथे येते.

विद्यापीठात काम करताना ताकवले सर विद्यार्थी कल्याण केंद्राचे प्रमुख झाले. विद्यार्थ्यांच्या कल्याणासाठी त्यांनी अनेक योजना आखल्या. पारंपरिक शिक्षणपद्धती, सामाजिक ज्ञान यांच्या माध्यमातून व्यक्तिविकास व समाजविकास या प्रक्रियेला चालना दिली. याच काळात त्यांनी केलर फ्रेड या शिक्षणतज्ज्ञाचे विचार अमलात आणून विद्यार्थ्यांना स्वविकासाच्या विविध संधी उपलब्ध करून दिल्या. यामुळे ताकवले सर विनोबांच्या शब्दांत- 'जो कमीतकमी शिकवतो, पण शिकवणे साध्य करतो तो खरा शिक्षक' असे शिक्षक झाले.

कुलगुरूपद त्यांच्याकडे चालत आले. विद्यार्थिहिताचे निर्णय, परीक्षा पद्धतीत सुधारणा, अद्ययावत संगणक सुविधा देणारे देशातील पहिले विद्यापीठ, संगणकशास्त्राचे अभ्यासक्रम सुरू करणे, संगमनेर महाविद्यालयातील शिक्षणाचा पुनर्रचनेचा प्रयोग, ज्ञानविस्तार विभाग, एज्युकेशन मीडिया रिसर्च सेंटर (ईएमआरसी), ललित कला केंद्र या सगळ्या पुढाकारात ताकवले सरांची दूरदृष्टी दिसून येते. अमेरिकेच्या उच्चायुक्तांचा सल्लागार होणे सोडून स्वतःला मुक्त शिक्षणासाठी वाहून घेणे सोपे नव्हते. मुक्त विद्यापीठ आराखडा तयार करण्यापासून ते या विद्यापीठाचे पहिले कुलगुरू म्हणून कारकीर्द हा टप्पा त्यांनी सहजपणे पेलला. ज्ञानगंगा घरोघरी नेऊन सुरुवातीच्या तीन हजार विद्यार्थ्यांची संख्या साडेसहा लाख विद्यार्थ्यांपर्यंत नेली. याचाच अर्थ असा की, विद्यार्थ्यांची फार मोठी गरज होती.

कुलगुरू राम ताकवले आणि कृषिशास्त्रज्ञ श्रीपाद अ. दाभोळकर एकत्र आल्यावर मुक्त विद्यापीठात जे मुक्त शिक्षणाचे प्रयोग झाले ते खरोखरीच अजब होतं. दोन बुद्धिमान माणसे एकत्र आल्यावर समाजाचे कसे भले होऊ शकते याचा हा वस्तुपाठ होय. कृषिक्रांतीचे प्रयोग, माती परीक्षण, द्राक्ष लागवड, काडेपेटीचा आणखी एक वेगळा उपयोग, कृषी विज्ञान केंद्र असे हटके प्रयोग त्यांनी केले.

'घरच्या कुलगुरू : प्रभावती ताकवले' या प्रकरणात भेटणारे ताकवले सर वेगळेच आहेत. स्वतःची समाजवादी मते बाजूला ठेवून पत्नीसाठी सत्यनारायणाच्या पूजेला बसणारे कुलगुरू, घरासाठी वेळ देणारे सर अशी कुटुंबवत्सल रूपे समोर येतात. पुन्हा एकदा ताकवले सरांचे शिक्षणतज्ज्ञ म्हणून दर्शन घडते ते दुसऱ्या इनिंगमध्ये. महाराष्ट्र नॉलेज कॉर्पोरेशन लिमिटेड- (एमकेसीएल)च्या संस्थापक सदस्याच्या रूपाने. समाजातील डिजिटल दरी कमी करण्यासाठी या संस्थेच्या स्थापनेत त्यांनी पाच जणांसह पुढाकार घेतला. आणि महाराष्ट्रभर ताकवले सर सर्वत्र पोहोचले.

आता प्रश्न असे निर्माण होतात की, हे पुस्तक वाचायचे कोणी आणि कशासाठी? आयुष्याच्या कोणत्या ना कोणत्या टप्प्यावर प्रत्येकाला अपयशाचा सामना करावा लागतो. अपयशाचे रूपांतर यशात करण्यासाठी अफाट मेहनत घ्यावी लागते. विद्यार्थिदशेत अनेकदा यशाच्या कसोट्या वेगळ्या असतात. कधीकधी विद्यार्थी आणि शिक्षक यांची अवस्था 'दोन ध्रुवांवर दोघे आपण' अशी असते. यातून मार्ग काढून पुढे जावे लागते. शिक्षण पूर्ण झाल्यावर शिक्षणक्षेत्रात येऊ इच्छिणाऱ्यांसाठी आज अनेक नवनवी आव्हाने उभी राहात आहेत. कोविड काळानंतर शिक्षणक्षेत्रात अभूतपूर्व उलथापालथ घडून आली आहे. जुनी विचारसरणी आणि नवे तंत्रज्ञान यांचा मेळ कसा घालायचा असा प्रश्न पडला तर त्याची उत्तरे आपणांस या पुस्तकात सापडतील.

जागतिक पातळीवर शिक्षणक्षेत्रात चाललेले प्रयोग योग्य वेळीच लक्षात घेऊन, भारतीय भूमीत त्यांचे भारतीयीकरण कसे करता येईल याचा विचार करायलाही हे पुस्तक प्रवृत्त करते. 'ज्ञानगंगा घरोघरी' घेऊन जायची असेल तर या समाजातील घर आणि दार नसलेल्या समाजाचा विचार करावा लागेल. फिरस्ती कामगारांची मुले, पाड्या- तांड्यांवर राहणारा समूह, शिक्षणाच्या परिघाबाहेर असणारा समाज या सगळ्यांना कवेत घेणाऱ्या मुक्त शाळांची, शिक्षणाची गरज आहे.

**– प्रा. डॉ. गणेश राऊत**, पुणे



Scanned with OKEN Scanner